महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ ,
पणे विभागीय मंडळ . पणे – ४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION. PUNE DIVISIONAL BOARD . PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN 25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY 25536781/82/83 / 25536712 (OFF)

E-MAIL sscboardpune@gmail.com
Website- www sscboardpune in
Telegram-'SECBOARD'PUNE

महत्वाचे

क्र.पुविमं/शाखा क/आवेदन/6330
पुणे-४११००५
दिनांकः- 05/12/२०२४

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा/विद्यालय,
जिल्हा–पुणे, अहमदनगर, सोलापूर.

**विषय:**– माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी. ) परीक्षा फेब्रुवारी–मार्च २०२५ विद्यार्थ्यांची अतिविलंब/विशेषअतिविलंब/ अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखांबाबत...

संदर्भ :– १- क्र.रा.मं./परीक्षा-८/४६०७ दि.२८/११/२०२४ रोजीचे पत्र

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, मंडळ विनियम १९७७ नियम क्र. ९३ अन्वये फेब्रुवारी–मार्च २०२५ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेस प्रविष्त होणाऱ्या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह परीक्षेची आवेदनपत्र ऑनलाईन स्विकारण्याची मुदत दि. ३०/११/२०२४ रोजी संपुष्टात येणार आहे.

आवेदनपत्र सादर करण्याची निर्धारीत मुदत संपल्यानंतर (१)श्रेणी/तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा सुरु होण्यापूर्वी ३० दिवसाचा कालावधी वगळून त्याअगोदर प्रतिदिनी रु. ५०/– याप्रमाणे अतिविलंब शुल्क, (२) अतिविलंब शुल्काच्या निर्धारित तारखेनंतर लेखी किंवा प्रात्यक्षिक परीक्षेच्या अगोदर जी परीक्षा सुरु होणार आहे, त्यातील सुरुवातीच्या १५ दिवसापर्यंत प्रती विद्यार्थी प्रती दिन रु. १००/– विशेष अतिविलंब शुल्क व तदनंतरच्या १५ दिवसांकरीता व परीक्षेच्या अगोदरच्या दिवसापर्यंत म्हणजेच दि. २०/२/२०२५ पर्यंत रु.२००/– प्रमाणे अतिविशेष अतिविलंब शुल्क आकारुन आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

लेखी परीक्षा दि. २१/०२/२०२५ रोजी सुरू झाल्यानंतर कोणत्याही नियमित, पुनर्परिक्षार्थी, श्रेणीसुधार, खाजगी विद्यार्थी, तुरळक व आय.टी.आय. विषय घेणा–या विद्यार्थ्याची परीक्षा आवेदनपत्रे स्विकारली जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

| परीक्षा | अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु. ५०/– प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु. १००/– प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | अतिविशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु. २००/– प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) |
|---|---|---|---|
| माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा | रविवार दिनांक ०१/१२/२०२४ ते शनिवार दिनांक ०४/०१/२०२५ | रविवार दिनांक ०५/०१/२०२५ ते रविवार दिनांक १९/०१/२०२५ | सोमवार दिनांक २०/०१/२०२५ ते गुरूवार दिनांक २०/०२/२०२५ |

सदर आवेदनपत्र माध्यमिक शाळेने ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.in यासंकेतस्थळावर भरावयाची आहेत त्यानंतर विद्यार्थी व मुख्याध्यापक यांच्या स्वाक्षरीसह आवेदनपत्राची Printout व आवेदनपत्र जमा करण्याच्या दिवसापर्यंतचे अतिविलंब/ विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्क रोखीने अथवा चलनाने जमा करण्यात यावे सदर शुल्क प्राप्त झाल्यानंतरच अर्ज ग्राह्य धरण्यात येईल. तसेच आवेदन पत्राच्या Printout सोबत शाळेचे मुखपत्र, विद्यार्थ्याच्या यापूर्वीच्या परीक्षांच्या गुणपत्रिकांची साक्षांकित छायाप्रत, परिशिष्ट–अ व विद्यार्थ्याचे हमीपत्र सादर करण्यात यावे. सदर कागदपत्रे विद्यार्थ्याचा ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतरच्या लगतच्या दुस–या दिवशी (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून) विभागीय मंडळात हस्तपोहोच सादर करणे अनिवार्य आहे.

अशा विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा दयावी लागेल तसेच त्याचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होवू शकला नाही तरी विद्यार्थ्याची त्यास हरकत राहणार नाही अशा आशयाचे विद्यार्थ्याकडून हमी पत्र घेण्यात यावे व ते मंडळास सादर करावे.

त्याचप्रमाणे आवेदनपत्रामध्ये नाव/जन्मतारीख/विषय/माध्यम याबाबत Prelist च्या दुरूस्त्या राहिलेल्या असल्यास Online पद्धतीने १० डिसेंबर २०२४ पर्यंत करण्यात यावे.

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,पुणे–०५.

सोबत:–

१. परिशिष्ट –अ नमूना.
२. परीक्षा शुल्क विवरण तक्ता.
३. विद्यार्थ्यांचे हमीपत्र.

# परिशिष्ट – ब

## फेब्रु–मार्च २०२५ माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा

### अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्कासह प्राप्त झालेल्या आवेदनपत्राची संकलित केलेली माहिती

विभागीय मंडळाचे नाव : ------------ विभागीय मंडळ जिल्हयाचे नाव : ------------------

(संपूर्ण रकाने परिपूर्ण भरावेत)

| लग ांक | अ. क्र. | विद्यार्थ्यांचे पूर्ण नाव | शाळा सांकेतिक क्रमांक | विभागीय मंडळात अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | अति विलंबाचे एकूण दिवस | अति विलंबाचे कारण | दंडाची रक्कम रुपये (फक्त दंडाची) | विद्यार्थी नियमित / पुनर्परीक्षार्थी | मुख्याध्यापक शिफारस होय / नाही | विभागीय अध्यक्षांची शिफारस होय / नाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

विभागीय सचिव

_______ विभागीय मंडळ



47

# परिशिष्ट–अ

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४.

परीक्षेचे नावः ----------------------------

विभागीय मंडळाचे नावः ----------- विभागीय मंडळ

प्रकरणिका क्रमांकः ------------------------

विद्यार्थ्यांची मुदतबाहय आवेदनपत्रे स्विकारण्याबाबत शिफारस

**इ.१० वी**

१) विद्यार्थ्यांचे नाव : ----------------------------------------------

२) शाळेचे नाव व पत्ता : ------------------------------------------

३) शाळेचा सांकेतांक क्रमांक : -----------------------------------------

४) विद्यार्थ्यांना आवेदनपत्रे सादर करता आली नाहीत त्याबाबत खालील कारणासमोर (✓) अशी खूण करावी.

- अ ( ) विद्यार्थ्याचा प्रलंबित आजार
- ब ( ) विद्यार्थ्याच्या पालकाचे आकस्मिक निधन
- क ( ) नैसर्गिक आपत्ती
- ड ( ) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास
- इ ( ) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी/परदेशी जाणे भाग पडल्यास

५) उपरोक्त कारणाचे अनुषंगाने सादर केलेला पुरावा.

१. ------------------------ २. --------------------------

३. ------------------------ ४. --------------------------

५. ---------------------------------------------------

६) शाळा प्रमुखांची शिफारस :-

---------------------------------------------------------

---------------------------------------------------------

मुख्याध्यापक स्वाक्षरी व शिक्का

७) अ) अतिविलंबाचे एकूण दिवस : -------- ब) अतिविलंबाच्या दंडाची रक्कम ----------

क) दंड कशाप्रकारे भरला – रोखा/ चलन क्रमांक ------------------

ड) विभागीय अध्यक्षांची शिफारस ----------------------------------

----------------------------------

मी या प्रकरणी सादर करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची छाननी केली असून, उमेदवाराने आवेदनपत्र उशीरा सादर करण्यासाठी दिलेले कारण योग्य आहे. केवळ अपवादात्मक प्रकरण म्हणूनच मंडळ विनियम क्रमांक ४६ मधील तरतुदीनुसार उमेदवारांचा अर्ज स्वीकारावा अशी माझी शिफारस आहे. सदर विद्यार्थ्यांचे आवश्यक ते अतिविलंब शुल्क कार्यालयात जमा केले आहे.

विभागीय अध्यक्षांची स्वाक्षरी,
विभागीय मंडळाचे नाव व शिक्का

# <u>विद्यार्थ्याने द्यावयाचे हमीमत्र</u>

**मी कुमार/कुमारी**

**शाळा संकेतांक क्रमांक** (                    ) या शाळेत शिक्षण घेत आहे. मी **अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्कानुसार** आवेदनपत्र भरले असल्यामुळे विभागीय मंडळ निश्चित करेल त्या परीक्षा केंदावर परिक्षा द्यावी लागेल. तसेच माझा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होवू शकला नाही त्यास माझी काही हरकत राहणार नाही.

विद्यार्थ्याची स्वाक्षरी